## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २४/०९/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६६/२०१२/जा.६८७, दिनांक २८/०९/२०१२, ११/१०/२०१२, व ०३/११/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली (पूर्व) यांचे दिनांक २६/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

४) मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यांच्या वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांचे दिनांक १०/१०/२०१२ रोजी प्राप्त निवेदन.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली (पूर्व) यांचे दिनांक १२/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

६) मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यांच्या वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांचे दिनांक १६/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

७) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली (पूर्व) यांचे दिनांक १८/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

८) मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यांच्या वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांचे दिनांक २०/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

९) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली (पूर्व) यांचे दिनांक ०१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

१०) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली (पूर्व) यांचे दिनांक २०/११/२०१२ रोजीचे अभिवेदन.

११) मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यांच्या वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांचे दिनांक २०/११/२०१२ रोजी प्राप्त निवेदन.

१२) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक २१/०१/२०१३ रोजी प्राप्त रासायनिक पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
सत्यमेव जयते
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६६/२०१२/जा. ९५८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इंशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २८/०२/२०१३.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १२/०९/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह गाळा क्र. १२, शंकरानगर, कल्याण शीळफाटा रोड, सोनारपाडा, डोंबिवली (पूर्व) येथील गाळ्यावर सुमारे ०१:३० वाजता प्रवेश केला असता, तेथे काऊंटरवर एक इसम बसलेला आढळून आला. सदर इसमास पथकातील अधिकाऱ्यांनी त्यांची ओळख करुन देऊन भेटीचे प्रयोजन सांगितले. सदर इसमास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नाव प्रविणचंद्र वेलजी गुटखा असे पंचांसमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी प्रविणचंद्र गुटखा यास सदर ठिकाणी कोणता व्यवसाय चालतो याविषयी विचारणा केली असता, त्याने ते मे. फोरम एंटरप्रायजेस या नावाने माहे डिसेंबर, २००६ पासून खाद्यतेलाचा व्यवसाय करीत असल्याचे पंचांसमक्ष सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी प्रविणचंद्र वेलजी गुटखा याचेकडे सदर गाळ्यामध्ये असलेल्या पिशव्या, कॅन व डब्यांमधील द्रवपदार्थाबाबत विचारणा केली असता, त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे खाद्यतेल टँकरमध्ये मागवून ते व्यवसायाच्या ठिकाणी उतरवून खाद्यतेलाचे १ लि. क्षमतेच्या प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये, ५ लि. क्षमतेच्या प्लास्टीक कॅनमध्ये व १५ लि. क्षमतेच्या पत्र्याच्या डब्यांमध्ये पॅकींग करुन व त्यावर जसमीन, अनुराग, छोटु पहेलवान, धरमवीर, शेतकरी, मयुर स्वाद, रिद्धी सनफ्लॉवर, उत्सव, सनटॉप, चांदणी, इंडीका अशा विविध नावाचे बँड लेबल लावून घाऊक विक्री करत असल्याचे पंचासमक्ष सांगितले.

प्रविणचंद्र गुटखा यांना साठवणुकीसाठी आवश्यक असलेल्या परवान्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मे. फोरम एंटरप्रायजेस या ट्रेड नावाचा खाद्यतेलाचा घाऊक परवाना क्र.३९/फ/डोंबिवली/१२/सं.पं./३२ (घा.), दिनांक ३१.१२.२०१६ पर्यंत वैध असलेल्या अनुज्ञप्तीची प्रत सादर करुन ते स्वत: मालक असल्याचे सांगितले. या अनुषंगाने गुटखा यांचेकडे साठापुस्तक/रोख विक्री पावती पुस्तक/विक्री नोंदवही/पाक्षिक/मासिक वितरणपत्र इ. कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांनी शिधावाटप कार्यालयाकडून प्रमाणित केलेले साठा पुस्तक सादर केले. तथापि, रोख विक्री पावती पुस्तक/विक्री नोंदवही ठेवली नसल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले.

अधिकाऱ्यांनी साठापुस्तकाची पडताळणी केली असता, सदर साठापुस्तकामध्ये विविध प्रकारच्या खाद्यतेलाची आवक व विक्रीची स्वतंत्रपणे नोंद घेणे आवश्यक असताना मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक प्रविणचंद्र वेलजी गुटखा यांनी स्वतंत्र नोंद न घेता त्यांनी खाद्यतेलाची एकत्रित आवक/विक्रीची साठापुस्तकात नोंद घेतल्याचे पथकास आढळून आले. तसेच अधिकाऱ्यांनी पाक्षिक/मासिक विवरणपत्रांची पडताळणी केली असता, यामध्ये देखील खाद्यतेलाची विविध प्रकाराची आवक/विक्रीची स्वतंत्रपणे नोंद न घेता खाद्यतेलाची एकत्रित

आवक/विक्रीची नोंद घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे कोणत्या प्रकारच्या खाद्यतेलाची आवक तसेच पॅकींग करुन त्याची विक्री केली याचा बोध होत नसल्याने पथकास नमूद गोदामामध्ये विविध प्रकारचे खाद्यतेलामध्ये भेसळ केली असल्याचे सकृतदर्शनी पंचांसमक्ष आढळून आले. सदर बाबत प्रविणचंद्र गुटख्या यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी सदर बाब त्यांना मान्य असल्याचे पंचांमसक्ष सांगितले.

प्रविणचंद्र गुटख्या यांनी ते ग्राहकास/खरेदीदारास त्यांचे ट्रेड नाव, पत्ता, अनुज्ञप्ती क्रमांक, दिनांक, परिमाण, दर, किंमत, व्हॅट तसेच ग्राहकाचे नाव व पत्ता इ. तपशील नमूद असलेली कोणतीही रोख पावती/बिल देत नसल्याचे सांगून रोख पावती पुस्तक तसेच बिल बुक पंचांसमक्ष सादर केले नाही. अधिकाऱ्यांनी प्रविणचंद्र वेलजी गुटख्या यांचा तसा जबाब नोंदविण्यात आला आहे.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी परवानाधारकाकडे खाद्यतेलाची आवक झालेली बिले सादर करण्याची विनंती केली असता, त्यांनी सदरची आवक बिले सादर केली. अधिकाऱ्यांनी सदर आवक बिलांची साठा पुस्तकाशी तुलनात्मक पडताळणी केली असता, त्यामध्ये दिनांक ६.८.१२/१९१५०, ७.८.१२/२००५०, ८.८.१२/२००५०, ९.८.१२/१९७४०, १०.८.२०१२/९७५०, ११.८.१२/९९७०, १५.८.१२/१६१९०, २८.८.१२/९९००, ३०.८.१२/९८८०, १.८९.१२, ९९५० व ७.९.१२/९८०० कि.ग्रॅ. खाद्यतेलाच्या साठ्याची आवक म्हणून साठा पुस्तकात दर्शविले असून प्रत्यक्षात सदर आवक झालेल्या साठ्याची खरेदी बिले घटनास्थळी सादर केली नाहीत. यावरुन विनाखरेदी बिलांचा साठापुस्तकात दर्शविण्यात आलेला साठा हा परवानाधारकाने अवैधरित्या खरेदी केल्याचे पथकाच्या निदर्शनास आले.

सबब, उपरोक्त आढळून आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांनी खाद्यतेलाचा साठा जागीच सीलबंद करुन जप्त केला. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | साठवणुकीचा तपशील | खाद्यतेलाचा प्रकार | ब्रँड लेबल | संख्या | अंदाजे साठा (कि.ग्रॅ.) | अंदाजे किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | लोखंडी टाकी क्र.१ मधील साठ्याची किंमत | साधे पामोलिन/ रिफाईंड इम्पोर्टेड | - | १ | १६३८.७९० | १,०६,५२१.३५/- |
| २. | लोखंडी टाकी क्र.२ मधील साठ्याची किंमत | सुपर पामोलिन/आरबीडी | - | १ | ९९३.२१० | ६७,५३८.२८/- |
| ३. | लोखंडी टाकी क्र.३ मधील साठ्याची किंमत | सुपर पामोलिन/आरबीडी | - | १ | १५८९.१३० | १,०८,०६०.८४/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | लोखंडी टाकी क्र.४ मधील साठ्याची किंमत | सोयाबीन | - | १ | १८३७.४४० | १,४६,९९५.२०/- |
| ५. | लोखंडी टाकी क्र.५ मधील साठ्याची किंमत | साधे पामोलिन/ रिफाईंड इम्पोटेड | - | १ | ४७८.९१० | ३१,१२९.१५/- |
| ६. | लोखंडी टाकी क्र.६ मधील साठ्याची किंमत | सुपर पामोलिन/आरबीडी | - | १ | ११५७.३६० | ७८,७००.४८/- |
| ७. | लोखंडी टाकी क्र.७ मधील साठ्याची किंमत | साधे पामोलिन/ रिफाईंड इम्पोटेड | - | १ | २२३.३०० | १४,५१४.५०/- |
| ८. | प्लास्टिकच्या पिशव्या ६९० मिली/६२६ ग्रॅम | साधे पामोलिन | पामोलिन | १००५ | ६२९.१३० | ६५,३२५.००/- |
| | | सनफ्लॉवर | सनफ्लॉवर | ५२० | ३२५.५२० | ५७,२००.००/- |
| ९. | प्लास्टिक कॅन ५ ली. क्षमता | सनफ्लॉवर | सनटॉप | ३२ | १४५.६०० | १३,६००.००/- |
| | | | जसमीन | १६ | ७२.८०० | ६,८८०.००/- |
| | | शेंगतेल | अे-वन | २ | ९.१०० | ७९०.००/- |
| | | | सु.काठीयावाड | ३० | १३६.५०० | ११,७००.००/- |
| | | | धरमवीर | ११ | ५०.०५० | ४,५१०.००/- |
| | | | अनुराग | ५ | २२.७५० | १,९७५.००/- |
| | | राईतेल | छोटु पहेलवान | ३० | १३६.५०० | १४४००.०० |
| १०. | पत्र्याचे लोखंडी डबे १५ ली. क्षमता | पामोलीन | ओम | ५२ | ७०९.८०० | ५२,०००.००/- |
| | | सोयाबीन | सोना | १४ | १९१.१०० | १७,५००.००/- |
| | | सनफ्लॉवर | सनटॉप | १६ | २१८.४०० | १९,३६०.००/- |
| | | | नेने | २ | २७.३०० | २,४४०.००/- |
| | | | उत्सव | ३ | ४०.९५० | ३,९६०.००/- |
| | | | जसमीन | ८३ | ११३२.९५० | १,१०,३९०.००/- |
| | | शेंगतेल | अे-वन | १५ | २०४.७५० | १९,५००.००/- |
| | | | सु.काठीयावाड | ३८ | ५१८.७०० | ४९,०२०.००/- |
| | | | शेतकरी | ६ | ८१.९०० | ७,६८०.००/- |
| | | राईतेल | किसान | १५ | २०४.७५० | १९,८००.००/- |
| | | | छोटु पहेलवान | ३० | ४०९.५०० | ३९,०००.००/- |
| | | वनस्पती | फस्ट क्लास | ७५ | १०२३.७५० | ७५,०००.००/- |
| ११. | लोखंडी टाकी क्र.१ या रिकाम्या टाकीची अंदाजित किंमत | | | १ | ० | ४०,०००.००/- |
| १२. | लोखंडी टाकी क्र.२ या रिकाम्या टाकीची अंदाजित किंमत | | | १ | ० | ४०,०००.००/- |
| १३. | लोखंडी टाकी क्र.३ या रिकाम्या टाकीची अंदाजित किंमत | | | १ | ० | ४०,०००.००/- |

CONTROLLER OF ... HEAD

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | लोखंडी टाकी क्र.४ या रिकाम्या टाकीची अंदाजित किंमत | १ | ० | ४०,०००.००/- |
| १५. | लोखंडी टाकी क्र. ५ या रिकाम्या टाकीची अंदाजित किंमत | १ | ० | २०,०००.००/- |
| १६. | लोखंडी टाकी क्र.६ या रिकाम्या टाकीची अंदाजित किंमत | १ | ० | २०,०००.००/- |
| १७. | लोखंडी टाकी क्र.७ या रिकाम्या टाकीची अंदाजित किंमत | १ | ० | ५,०००.००/- |
| १८. | १ ली.पिशव्या पॅकींग युनिट क्र. १ व २ ची अंदाजित किंमत | १ | ० | ५,००,०००.००/- |
| १९. | १५ ली. डब्याचे पॅकींग करण्याचे युनिटची अंदाजित किंमत | १ | ० | ३५,०००.००/- |
| २०. | १५ ली. डब्याचे सिलींग करण्याचे युनिटची अंदाजित किंमत | १ | ० | ५,०००.००/- |
| २१. | १५ ली. क्षमतेच्या रिकाम्या पत्र्याच्या डब्यांची अंदाजे किंमत | २५०० | ० | ६२,५००.००/- |
| २२. | ५ ली. क्षमतेच्या रिकाम्या प्लास्टिकच्या कॅनची अंदाजे किंमत | १८२४ | ० | ४७,४२४.००/- |
| २३. | ५ हॉर्सपावर्सच्या मोटर पंपाची अंदाजित किंमत | १ | ० | ५,०००.००/- |
| | एकूण साठा व जप्त मुद्देमालाची किंमत | | १४२०९.९४० | २०,०५,४१३.८०/- |

उपरोक्त नमूद साठा हा भेसळयुक्त पॅकींग करुन विक्री होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्यांमुळे अधिकाऱ्यांनी, परवानाधारकासमक्ष त्याच्या व्यवसायाच्या पत्त्यावरील साठवणूक केलेले खाद्यतेलाचे नमुने पृथ:करणासाठी घेऊन जप्त मुद्देमाल जागीच सीलबंद केला.

अशाप्रकारे मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक प्रविणचंद वेलजी गुटखा यांनी खाद्यतेलाच्या घाऊक परवान्यावरील अटी/शर्तीनुसार रोख विक्री पावती पुस्तक/विक्री नोंदवही ठेवली नसल्याने तसेच साठापुस्तक व पाक्षिक/मासिक विवरणपत्रांमध्ये विविध प्रकाराच्या खाद्यतेलाची आवक-विक्रीची स्वतंत्रपणे नोंद न घेता खाद्यतेलाची एकत्रित आवक-विक्री नमूद केली असल्याने ते खाद्यतेलाची भेसळ करुन विक्री करीत असल्याचे संकृतदर्शनी दिसून आले आहे. परवानाधारक ग्राहकास/खरेदीदारांस त्यांचे ट्रेड नाव, पत्ता, अनुज्ञप्ती क्रमांक, दिनांक, परिमाण, दर, किंमत, व्हॅट तसेच ग्राहकाचे नाव व पत्ता इ. तपशिल नमूद असलेली कोणतीही रोख पावती/बिल देत नसल्याचे आढळून आले. रोख पावतीची स्थळ प्रत ठेवणे हे अनुज्ञप्तीधारकास बंधनकारक असताना त्याने त्याचे उल्लंघन केल्याचे अधिकाऱ्यांना प्रथमदर्शनी दिसून आले असून खाद्यतेल ज्या टाक्यांमध्ये साठविले जाते त्यांवर संबंधित तेलाचे नाव नमूद नसल्याचे दिसून आले. गाळ्याच्या दर्शनी भागी व्यवसायाच्या नावाचा फलक लावलेल्या नसल्याचे तसेच साठाफलक/भावफलक लावले नसल्याचे दिसून आले असून परवानाधारकाने परवाना घेतल्यापासून तपासणीच्या दिनांकापर्यत केलेली विक्री ही अवैध असल्याचे अधिकाऱ्यांना तपासणीत निष्पन्न झाले. परवानाधारकाकडे तपासणीच्यावेळी ब्रँड लेबल लावलेला राई तेलाचा शिल्लक साठा ८११.५० कि.ग्रॅम आढळून आला. परंतु त्याबाबतचे खरेदी बिल तपासणीकरीता सादर केले नाही. तसेच

तपासणीवेळी ब्रँड लेबल लावलेला शेंगदाणा तेलाचा शिल्लक जादा ९०७ कि.ग्रॅ. इतका आढळला. तथापि याबाबतची खरेदी बिलं तपासणीकरीता सादर केले नाही. म्हणजेच त्यांनी राईतेल व शेंगदाणा तेल अवैधरित्या प्राप्त करुन स्वत:च्या आर्थिक लाभासाठी वेगवेगळ्याबँडचे लेबल लावून ते शेंगदाणा तेल आहे असे भासवून उपभोक्त्यांची तसेच शासनाची फसवणूक केली असल्याचे सिध्द झाले असून त्यांनी जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३,७,८,९ व १० तसेच महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापाराची अनुज्ञप्ती आदेश १९९८ चे कलम २,३,११,१३,१४ व १५ तसेच अनुज्ञप्तीतील अट/शर्त क्र.३, ४, ४, ६, ७, ८, १० व १३ चा भंग केल्याने त्यांचेविरुध्द मानपाडा पोलीस ठाणे, ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ५२/२०१२, दिनांक १३/०९/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १०/१०/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १०/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. तथापी, मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यांच्या वतीने ॲड. श्री पी.ए. पोळ यांनी वाचावे क्र. ४ अन्वये वकालतनाम्यासह निवेदन सादर करुन त्यांचे लेखी म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ३०/१०/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ३०/१०/२०१२ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २०/११/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी श्री. महेंद्र शिंदे यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. १० अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक व त्यांच्या वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ११ अन्वये लेखी निवेदन सादर केले.

CONTROLLER OF ... HEAD ... MUM

तद्नंतर या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक २१/०१/२०१३ रोजी प्राप्त रासायनिक पृथ:करण अहवालात, Exhibit nos. 1, 2, 3, 5, 6, 7 and 12 contain palmolein oil, Exhibit nos. 4 and 9 contain soyabean oil, Exhibit no. 8 contain groundnut oil, Exhibit no. 10 contain mustard oil, Exhibit no. 11 contain sunflower oil and Exhibit no. 13 contain vanaspati ghee, असे नमूद आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोंबिवली (पूर्व) यांचे दिनांक १२/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, गुन्हा नोंद करुन यातील आरोपी यांना लागलीच ताब्यात घेऊन अटक करण्यात आले. त्यानंतर आरोपीत यांना मा. न्यायालयात पोलिस कोठडी रिमांड कामी हजर केले असता मा. न्यायालयाने दिनांक १५/०९/२०१२ पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली. तद्नंतर मा. अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कल्याण यांचे न्यायालयात जामीनासाठी केलेल्या अर्जावर सुनावणी होवून मा. न्यायालयाने आरोपीतांस दिनांक ०५/१०/२०१२ रोजी जामीन मंजुर केल्यानुसार आरोपी जामीनावर मुक्त झाले आहे तसेच सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल हा आरोपीताचे नमूद दुकानात असलेल्या वेगवेगळ्या लोखंडी टाक्यांमध्ये असून दुकानास सिल केले आहे. तरी सदर मुद्देमालाची लवकरात लवकर योग्य ती विल्हेवाट लावणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोंबिवली (पूर्व) यांचे दिनांक ०१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात तसेच दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मानपाडा पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी श्री. महेंद्र शिंदे यांनी युक्तीवाद केला की, सदर गुन्हयातील जप्त मुद्देमालाचे नमुने हे तपासणीसाठी मा. अंन्न विश्लेषक, अन्न चाचणी प्रयोगशाळा, अन्न व औषध प्रशासन विभाग यांचेकडे पाठविण्यात आले होते. त्या सर्व नमुन्यांची तपासणी होवून अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालामध्ये तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या नमुन्यात भेसळ नसल्याचे नमुद केले आहे. तरी सदर मुद्देमालाची लवकरात लवकर योग्य ती विल्हेवाट लावण्याची विनंती आहे असे नमुद केले.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक व त्यांच्या वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांनी युक्तीवाद केला की, घटनास्थळी विक्री पुस्तक अथवा विक्री नोंदवही नसल्याचे तसेच विविध प्रकारच्या खाद्यतेलाच्या साठयासाठी स्वतंत्र साठा नोंदवही, विक्री नोंदवही व खरेदी नोंदवही नसल्याचे

तसेच सदर तेलामध्ये भेसळ करीत असल्याचे त्यांच्या अशिलाने पंचांसमक्ष कबुल केल्याची बाब चुकीचे नमुद असुन वास्तविकत: नमुद आरोपांबाबत त्यांच्या अशिलाने काहीच लिहुन दिले नाही. त्यामुळे त्यांच्या अशिलाने गुन्हयातील नमुद आदेशांच्या कलमांचा भंग केलेला नाही. त्यांचे अशिल खाद्यतेलाचे भेसळ करीत नसुन त्यांनी पाच प्रकारच्या खाद्यतेलासाठी वेगळया साठवणुक टाक्या ठेवल्या आहेत. सदरचा साठा त्यांना विविध आस्थापनांकडून स्वतंत्र खरेदी बिलांद्वारे प्राप्त होत आहे. त्याअनुषंगाने त्यांचे अशिलाने या व्यवहारासाठी नोंदवही अद्यावत ठेवल्याचे सांगुन प्राथमिक शिल्लक, नविन आवक, एकुण साठा, विक्री आणि अखेर शिल्लक अलाहिदा प्रत्येक प्रवर्गाच्या खाद्यतेलासाठी नमुद आहे. तसेच त्यांच्या अशिलाने वनस्पती तेलासाठीही वेगळी नोंदवही ठेवली आहे. माझ्या अशिलाकडे सर्व खरेदी व विक्री बिले आणि नोंदवही उपलब्ध असल्याने त्यांना बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस परत घेण्यात यावे व त्यांचा जप्त असलेला मुद्देमाल विनाअटी व शर्तीचा त्यांना परत करण्यात यावा. त्यांचे अशिलाकडे खाद्यतेलाच्या व्यवसायासाठी आवश्यक घाऊक परवाना, गुमास्ता परवाना तसेच अन्न व औषध प्रशासन या विभागाकडील परवाना असल्याने त्यांनी जीवनावश्यक वस्तु कायद्याच्या तरतुदींचा भंग केलेला नाही. त्यांच्या अशिलाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदीनुसार त्याने खाद्यतेलाच्या उत्पादन, पुरवठा व वितरणामध्ये आडकाठी केलेली नाही. त्यामुळे नमुद आदेशाच्या तरतुदींच्या त्यांच्या अशिलाकडून भंग झालेला नाही. सदर बाबींचे अवलोकन करता त्यांच्या अशिलाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ तसेच पर्यायाने १९९८ च्या आदेशामधील तरतुदींचा भंग केल्याचे कोठेही सिध्द होत नाही. घटनास्थळी झालेल्या संयुक्त कारवाईमध्ये अन्न व औषध विभागाच्या पथकाने घेतलेल्या खाद्यतेलाच्या नमुन्यांचा पृथ:करण अहवाल प्राप्त झाला असुन त्यामध्ये सदर साठयाची पत हे अन्न सुरक्षा अधिनियम २०११ यास अनुसरुन आहे. त्यामुळे सदर प्रकरणी जप्त असलेला मुद्देमाल हा मुक्त करुन त्यांच्या अशिलास परत करण्यात यावा असे नमुद केले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १२/०९/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह गाळा क्र. १२, शंकरानगर, कल्याण शीळफाटा रोड, सोनारपाडा, डोंबिवली (पूर्व) येथील गाळ्यावर भेट दिली असता, प्रविणचंद्र वेलजी गुटखा हे मे. फोरम एंटरप्रायजेस या नावाने माहे डिसेंबर, २००६ पासून



CONTROLLER OF RATIONING ... HEA...

खाद्यतेलाचा व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले. ते वेगवेगळ्या प्रकारचे खाद्यतेल टँकरमध्ये मागवून व्यवसायाच्या ठिकाणी उतरवून खाद्यतेलाचे विविध क्षमतेमध्ये पॅकींग करुन जसमीन, अनुराग, छोटु पहेलवान, धरमवीर, शेतकरी, मयुर स्वाद, रिद्धी सनफ्लॉवर, उत्सव, सनटॉप, चांदणी, इंडीका अशा विविध नावाचे बँड लेबल लावून घाऊक विक्री करत असल्याचे पंचासमक्ष सांगितले. मे. फोरम एंटरप्रायजेस या ट्रेड नावाचा खाद्यतेलाचा घाऊक परवाना क्र.३९/फ/डोंबिवली/१२/सं.पं./३२ (घा.), दिनांक ३१.१२.२०१६ पर्यंत वैध असलेल्या अनुज्ञप्तीची प्रत सादर केल्याने त्यांचेकडे साठापुस्तक/रोख विक्री पावती पुस्तक/विक्री नोंदवही/पाक्षिक/मासिक वितरणपत्र इ. कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांनी साठा पुस्तक सादर केले. तथापि, रोख विक्री पावती पुस्तक/विक्री नोंदवही ठेवली नसल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. तसेच सदर साठापुस्तकाची पडताळणी केली असता, साठापुस्तकामध्ये व पाक्षिक/मासिक विवरणपत्रामध्ये विविध प्रकारच्या खाद्यतेलाची आवक व विक्रीची स्वतंत्रपणे नोंद घेणे आवश्यक असताना त्यांनी खाद्यतेलाची एकत्रित आवक/विक्री साठापुस्तकात व पाक्षिक/मासिक विवरणपत्र नोंद घेतल्याचे आढळून आले. तसेच ग्राहकास/खरेदीदारास त्यांचे ट्रेड नाव, पत्ता, अनुज्ञप्ती क्रमांक, दिनांक, परिमाण, दर, किंमत, व्हॅट तसेच ग्राहकाचे नाव व पत्ता इ. तपशील नमूद असलेली कोणतीही रोख पावती /बिल देत नसल्याचे सांगून रोख पावती पुस्तक तसेच बिल बुक सादर केले नाही. सदर बाबत प्रविणचंद्र गुटख्या यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी सदर बाब मान्य असल्याचे लेखी जबाबात कबुल केले आहे. तद्नंतर अधिकाऱ्यांनी परवानाधारकाकडे खाद्यतेलाची आवक झालेली बिले सादर करण्यास सुचित केले असता, त्यांनी सादर केलेल्या आवक बिलांची साठापुस्तकाशी तुलनात्मक पडताळणी केली असता, त्यामध्ये दिनांक ६.८.१२ ते ७.९.२०१२ या कालावधीतील दर्शविण्यात आलेल्या ११ आवक झालेल्या साठयाची खरेदी बिले घटनास्थळी सादर केली नाहीत. यावरुन विनाखरेदी बिलांचा साठापुस्तकात दर्शविण्यात आलेला साठा हा परवानाधारकाने अवैधरित्या खरेदी केल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. सबब, उपरोक्त आढळून आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांनी नमूद साठा हा भेसळयुक्त पॅकींग करुन विक्री होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्यामुळे परवानाधारकासमक्ष त्याच्या व्यवसायाच्या पत्त्यावरील साठवणूक केलेले खाद्यतेलाचे नमुने पृथःकरणासाठी घेऊन जप्त मुद्देमाल जागीच सीलबंद केला व त्यांचेविरुद्ध गुन्हा नोंद करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी, मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यांच्या वतीने सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात, घटनास्थळी विक्री पुस्तक अथवा विक्री नोंदवही नसल्याचे तसेच विविध प्रकारच्या खाद्यतेलाच्या साठयासाठी स्वतंत्र साठा नोंदवही, विक्री नोंदवही व खरेदी नोंदवही नसल्याचे तसेच सदर तेलामध्ये भेसळ करीत असल्याचे पंचांसमक्ष

कबुल केल्याची बाब चुकीची नमुद असुन वास्तविकत: नमुद आरोपांबाबत त्यांनी काहीच लिहून दिले नाही असे सांगुन ते खाद्यतेलाचे भेसळ करीत नसुन त्यांनी पाच प्रकारच्या खाद्यतेलासाठी वेगळया साठवणुक टाक्या ठेवल्या असल्याचे सांगितले आहे. सदरचा साठा त्यांना विविध आस्थापनांकडून स्वतंत्र खरेदी बिलांद्वारे प्राप्त होत आहे. त्याअनुषंगाने या व्यवहारासाठी नोंदवही अद्यावत ठेवल्याचे सांगुन प्राथमिक शिल्लक, नविन आवक, एकुण साठा, विक्री आणि अखेर शिल्लक प्रत्येक अलाहिदा प्रवर्गाच्या खाद्यतेलासाठी नमुद आहे. तसेच त्यांच्याकडे सर्व खरेदी व विक्री बिले आणि नोंदवही उपलब्ध असल्याने त्यांना बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस परत घेण्यात यावी व त्यांचा जप्त असलेला मुद्देमाल विनाअटी व शर्तीचा त्यांना परत करण्यात यावा, असे सांगितले आहे.

तथापी, मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यांनी सुनावणीचे वेळी त्यांचेवरील आरोप हे सिध्द होत नसल्याचे सांगितले असले तरी घटनास्थळी त्यांनी दिलेला जबाब हा स्वयंस्पष्ट असुन त्यांच्या तपासणीमध्ये आढळून आलेल्या गंभीर त्रुटी व अनियमितता त्यांनी पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात कबुल केले आहे. यावरुन त्यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभुल करणारे आहेत. मे. फोरम एन्टरप्रायजेस या ट्रेड नावाने त्यांचेकडे खाद्यतेलाचा घाऊक परवाना क्र.३९/फ/डोंबिवली/१२/सं.पं./३२ (घा.), दिनांक ३१.१२.२०१६ पर्यंत वैध असलेला परवाना आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ या आदेशामधील तसेच त्याअन्वये त्यांना देण्यात आलेल्या घाऊक परवानाच्या तरतुदींनुसार परवाना धारक म्हणुन त्यांनी साठा पुस्तक, खरेदी बिले, विक्री पुस्तक इ. दस्ताऐवज अद्यावत ठेवणे गरजेचे असुन सदरचा संपुर्ण अभिलेख तपासणी पथकास उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तथापी, प्रत्यक्षात तपासणीचे वेळी घटनास्थळी साठा पुस्तक वगळता इतर महत्वपूर्ण अभिलेख साठा मालक यांनी सादर केला नाही व तसे सादर न केल्याचे कबुल केले आहे. मे. फोरम एंटरप्रायजेस या नांवे खाद्यतेलाचा घाऊक व्यवसाय करीत असतांना साठा मालक म्हणुन ते करीत असलेल्या व्यवसायात व त्या अनुषंगाने आवश्यक अभिलेखात पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. परंतु तपासणीचे वेळी पथकास या महत्वपूर्ण बाबींचा अभाव असल्याचे सिध्द झाले आहे. प्रचलित नियमानुसार व्यवसाय करीत असतांना परवानाधारकास साठा खरेदी करतांना पुरवठादाराकडून खरेदी बिले प्राप्त करणे त्या अनुषंगाने साठा पुस्तकात नोंदी घेणे तसेच ते पॅकिंग करीत असलेल्या विविध प्रकारच्या खाद्यतेलाची प्रत्यक्षात उपभोक्त्यास विक्री करीत असतांना त्यांनी केलेल्या प्रत्येक विक्री व्यवहाराची बिले तयार करुन त्याचवेळेस उपभोक्त्यास देणे बंधनकारक आहे. तथापी, सदर तपासणीमध्ये दिनांक ०६/०८/२०१२ ते ११/०९/२०१२ या कालावधीतील साठेपुस्तकातील आवक नोंदी पथकाने पडताळून पाहिले असता, एकुण ३९ वेळा खाद्यतेलाची एकुण ४,३४,४०० लिटर्स आवक



CONTROLLER OF RATIONING ... HEAD ... MU

एकत्रित दर्शविण्यात आली असुन त्यापैकी १,५४,४३० लिटर्स साठयाची ११ खरेदी बिले सादर केली नसल्याची पथकास आढळून आली. सदरचा मोठ्या प्रमाणात खरेदी केलेला पामतेल, सोयाबिनतेल, शेंगदाणातेल इत्यादी विविध प्रकारचा खाद्यतेलाचा साठा हा एकत्रितरित्या साठापुस्तकात नोंद घेण्याचे प्रयोजन काय ? तसेच मोठया प्रमाणात विनाखरेदी बिलांचा साठा हा कोणाकडून खरेदी केला याचा बोध होत नाही. सबब, घटनास्थळी जप्त केलेल्या विविध प्रकारच्या खाद्यतेलाच्या घटनास्थळी सादर केलेल्या खरेदी बिलांबाबतही साशंकता वाटते. मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यांनी घटनास्थळी विक्री पुस्तक अथवा विक्री बिलांचा कोणताही तपशिल/अभिलेख सादर केला नसल्याने ते विना खरेदी बिलांचा साठा खरेदी करुन तो विना विक्री बिलांची अवैध विक्री करीत असल्याने त्यांचा संपूर्णतः अवैध व्यवसाय असल्याचे निष्पन्न होत आहे. या व्यतिरीक्त तपासणीमध्ये सुमारे ४२२१ लिटर्सची साठयामध्ये तफावत आढळून येणे हे अवैध व्यवसायाचे संकेत आहेत. सदर गैरकृत्यामुळे मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक यांनी परवानाधारक म्हणुन शासनाची विश्वासार्हता गमावली आहेच याशिवाय त्यांनी सदरचा अवैध व्यवसाय कार्यरत ठेवून इतर संबंधित शासकिय विभागांचीही दिशाभुल केली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक प्रविणचंद्र वेलजी गुटखा यांनी विविध प्रकारचे कमी प्रतीचे खाद्यतेल अवैध मार्गाने प्राप्त करुन ते स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वेगवेगळ्या ब्रॅन्डचे लेबल लावून ते सदरचा साठा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून जनसामान्यांच्या जीवीतास धोका निर्माण करुन शासनाची तसेच पर्यायाने उपभोक्त्यांची घोर फसवणुक केली असल्याचे सिध्द होत आहे. सबब, घटनास्थळी जप्त करण्यात आलेला खाद्यतेल/वनस्पतीचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मानपाडा पोलीस ठाणे, ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ५२/२०१२, दिनांक १३/०९/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) मे. फोरम एंटरप्रायजेस यांचा जप्त करण्यात आलेला विविध प्रकारचा खाद्यतेल/वनस्पतीचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण खाद्यतेल/वनस्पतीचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

~~मे. फोरम एंटरप्रायजेसचे मालक प्रविणचंद्र वेलजी गुटखा~~
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली (पूर्व) यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली (पूर्व) यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश, संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.